# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १२/०४/२०२२ (मंगळवार)

---

## शस्त्र बाळगणा—या ०२ आरोपींना स्थानीक गुन्हे शाखेचे पथकाने केले अटक.....

दिनांक १२.०४.२०२२ रोजी स्थानीक गुन्हे शाखेचे पथक हे घरफोडी गुन्हयाचे समांतर तपास करीत असतांना, गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली कि, मौजा तमस्वडी येथील श्रीकांत प्रल्हाद नारनवरे वय ३० वर्ष याचे घरी देशी अग्निशस्त्र आहे. अश्या खबरेवरून पंचासह नमुद ठिकाणी झडती घेतली असता, त्याचे घरी **एक देशी अग्नीशस्त्र व पाच जिवंत कारतुस असा एकुण ५००००/—रू चा माल मिळुन आला.** त्यास सखोल विचारपुस केली असता त्याने सांगितले कि, सदर चे शस्त्र हे सागर साहरे रा दहेगाव जोशी याने दिल्याचे सांगितले. तसेच प्रतिक लिलाधर चवरे रा सिल्लेवाडा योन यातुन दोन काडतुस फायर केल्याचे सांगितले. यावरून पोलीस स्टेशन पारशीवनी येथे पुढील कार्यवाही करीता दोन आरोपी नामे प्रतिक चवरे व श्रीकांत नारनवरे यांना पुढील कारवाई कामी पोलीस स्टेशन पारशिवनी यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कारवाई मा पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, यांचे आदेशाने स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक श्री अनिल राउत, पोलीस हवालदार विनोद काळे, ज्ञानेश्वर राउत, पो नाईक विरेंद्र नरड, चालक सफौ साहेबराव बहाळे यांचे पथकाने केली आहे.

**(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे**. )

## चोरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** – अंतर्गत सुकडी रोड हिंगणा एमआयडीसी बोरी, यातील फिर्यादीची मावशी नामे श्रीमती सुनिता अशोकराव वाढोकर रा. दत्तात्रय सोसायटी मनीष नगर नागपुर यांची अन्नापुर्णा इंजिनियर वर्क प्लॉट न १५/१६ एमआयडीसी बोरी येथे असुन कंपनी बंद असताना कोणीतरी अज्ञात चोराने दि ०९/०४/२०२२ चे १७/०० वा. ते दिनांक १०/०४/२२ चे १०/०० वा. दरम्यान **कंपनीचे शंटर वाकवुन आत प्रवेश करुन कंपनी मध्ये असलेल्या वेल्डिंग मशीन तोडफोड करुन त्यातील तांब्याचे कॉइल काढलेले दिसले, तसेच लोंखडी डाय केबल वायर मशीन व पाने त्यांची सेट असा एकुण अंदाजे ३०,००० /–रु माल चोरुन नेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे–विशाल इंद्रकुमार चांनेकर वय ४४ वर्ष रा प्लॉट नं १३८ मेन रोड नंदनवन ले आउट नागपुर यांचे रिपोर्टवरून पोस्टे एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४६१,३८० भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पोहवा/ प्रफुल राठोड मो.क्र. ८८०६८२८५६० हे करीत आहेत.

## मोटर सायकल चोरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत पाण्याचे टाकी जवळ फायर गार्डन एमआयडीसी बोरी, यातील फिर्यादीने आपली मोटर सायकल ड्रिम युगा क्र एमएच–४०/एएन–८४१४ काळ्या रंगाची कि अंदाजे २३,०००/–रू ची फायर गार्डन जवळ एमआयडीसी बोरी येथे ठेवली असता, **दिनांक ०४/०४/२२ चे १४. ०० वा. ते दिनांक ११/०४/२२ चे २३.१० वा दरम्यान . कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीची मोटर सायकल चोरून नेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे विजय नानाजी शेडमाके वय ३९ वर्ष रा खैरी खुर्द कान्होलीबारा जि नागपूर यांचे रिपोर्टवरून पो स्टे एम आय डि सी बोरी येथे अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा/ इकबाल मो नं ९९२३२४०५४० करीत आहेत.

## अकस्मात मृत्यु

**१.पोलीस स्टेशन अरोली :–** अंतर्गत यातील मृतक नामे– नवीन चुन्नीलाल सलामे वय २४ व रा सावंगी ता वारासिवनी जि बालाघाट हा दिनांक १०/०४/२२ चे १३/३० वा दरम्यान हा तारसा ते रेवराल रेल्वे स्टेशन दरम्यान खंबा नं १०९२/१८ येथे काही मजुरासह काम करित असताना अचानक खाली पडुन बेशुदध झाला, त्यास त्याचा पुतण्या राहुल सुर्रेद्र सलामे यानी उपचार कामी तारसा येथील प्राथमिक उपचार क्रेंद्र येथे नेले असता, तेथील डॉक्टरांनी तपासून त्यास रेफर केल्याने मेडिकल कॉलेज येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन उपचारापुर्वी ०२/१५ वा मृत घोषित केले. सदरचे मर्गचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन अरोली येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग नोंद करण्यात करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास पोलीस अंमलदार उमेश इंगळे मो नं ८०८०८६७६४५६ करीत आहेत.

## अकस्मात मृत्यु

**२.पोलीस स्टेशन कन्हान·:–** अंतर्गत यातील मृतक नामे– महादेव भावराव रवामत वय ४८ वर्ष रा. गांगणेर कन्हान हा दारू पिण्याचा सवईचा होता. दिनांक १०/४/२२ चे २२/०० वा. दर. मृतक हा रात्री दरम्यान जेवण करून घराच्या स्लॅपवर झोपण्याकरीता गेला असता, त्यास बाथरूमला जाणे असल्याने तो पायऱ्याने ,खाली येत असता, त्याचा पाय स्लिप होवुन तोल गेल्याने खाली पडुन डोक्याला जबर मार लागुन जखमी झाला उपचारा दरम्यान चौधरी हॉस्पीटल कामठी येथे मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी याचे रिपोर्टवरून पो स्टे कन्हान येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास पो. हवा वरकडे मो. नं. ९६३७००५३०३ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**